महाराष्ट्र शासन

**ग्राम विकास विभाग**

**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

दूरध्वनी क्र.०२२-२२८५०४७१, हेल्पलाईन क्र. – १८००२२२०१९ Email ID:directoriayruralhousing@gmail.com

**जा.क्र./IEC/१९२६-१/२०२३** **दिनांकः- २४/११/२०२३**

**प्रति,**

**कार्यकारी अध्यक्ष,**
**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,**
**तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद (सर्व)**

**विषयः- 'महा आवास अभियान २०२३-२४' जन जागृतीसाठी IEC साहित्य वापरणेबाबत**

**संदर्भः-** ग्राम विकास विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्र. प्रआयो-२०२३/प्र.क्र.२३६/ योजना-१०, दिनांक ०७/११/२०२३

राज्यातील सर्व ग्रामीण गृहनिर्माणयोजनांची अंमलबजावणी अधिक गतिमान करण्यासाठी व त्यामध्ये गुणवत्ता आणणेसाठी संदर्भिय शासन निर्णयान्वये दि. २० नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून **दि. २० नोव्हेंबर, २०२३ ते ३१ मार्च, २०२४** या कालावधीत **"महा आवास अभियान २०२३-२४"** राबविण्यात येत आहे. या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ दि. २३/११/२०२३ रोजी मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज यांच्या शुभहस्ते व मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

उपरोक्त शासन निर्णयान्वये अभियानाची जनजागृती, प्रसार व प्रसिध्दी करण्यासाठी पुढील प्रमाणे IEC साहित्याचा वापर करावयाचा आहे.

१. **अभियान होर्डींग(Hoarding)** :-

- ❖ अभियान होर्डिंग विभागस्तरावर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणाच्या प्रवेशव्दाराजवळ, जिल्हास्तरावर जिल्हा परिषद कार्यालयाच्या प्रांगणात व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाच्या प्रांगणात व तालुकास्तरावर पंचायत समिती कार्यालयाच्या प्रांगणात दर्शनी ठिकाणी लावण्यात यावेत.
- ❖ १०X७ स्के.फु. आकाराच्या अभियान होर्डिंगची फ्लेक्स (Hoarding Flex) छपाई (Digital Printing) करीता रूपये ९००/-प्रती होर्डींग या कमाल मर्यादेत खर्च करता येईल.

२. **अभियान बॅनर्स (Banners)** :-

- ❖ अभियान बॅनर्स ग्रामपंचायतस्तरावर ग्रामपंचायत कार्यालया जवळ लावण्यात यावेत.
- ❖ ५ X ३ स्के.फु. आकाराच्या अभियान बॅनर्स (Banners Flex) छपाई (Digital Printing) करीता रूपये ३००/- प्रती बॅनर या कमाल मर्यादेत खर्च करता येईल.

३. **अभियान पोस्टर (Poster)** :-

- ❖ अभियान पोस्टर विभागस्तरावर, जिल्हास्तरावर, तालुकास्तरावर व ग्रामपंचायतस्तरावर महत्वाच्या ठिकाणी लावण्यात यावेत.
- ❖ १८X१२ स्के. इंच आकाराच्या १२५ GSM Art Paper अभियान पोस्टर्सची छपाई (Digital Printing) करीता रूपये ६/- प्रती पोस्टर या कमाल मर्यादेत खर्च करता येईल.

प्रदर्शित करण्यात येणारे IEC साहित्यांचे फोटो काढण्यात येवून या कार्यालयाच्या iecsmurh@gmail.com या ई-मेलवर पाठवावे. या कार्यालयाकडून आपणास पुरविण्यात येणारे साहित्याची छपाई (Printing) करतांना व वाटप करतांना या पत्रात दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच या कार्यालयाने उपलब्ध करून दिलेले IEC साहित्य छपाई करतांना डिझाईन, मसुदा व साईज मध्ये शक्यतो कोणताही बदल होणार नाही, याची दक्षता घ्यावी, तथापी आवश्यकते प्रमाणे बदल करता येऊ शकेल. सर्व साहित्य विहीत मुदतीत वाटप व प्रसिध्द होईल, असे नियोजन करावे.

तरी उपरोक्त नमूद IEC साहित्याचा वापर विभागस्तरीय कार्यशळा, जिल्हास्तरीय कार्यशाळा, तालुकास्तरीय कार्यशाळा व ग्रामस्तरीय कार्यशाळा यांच्या निमित्ताने सर्वत्र करण्यात यावा. अभियाना संदर्भात प्रदर्शित करण्यात येणारे होर्डिंग, बॅनर, पोस्टर, इ. साहित्य हे अभियान कालावधी मधे सर्वांना दिसेल अशा पध्दतीने लावण्याची दक्षता घ्यावी. तसेच याबाबत जिल्हास्तरापासून ग्रामपंचायतस्तरापर्यंत सर्वत्र अभियानाबाबतची Visibility येईल असे पहावे व केलेल्या/करत असलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियमित याकार्यालयास सादर करावा.

**अभियानकालावधीत उत्कृष्ट काम करणारे विभाग, जिल्हे, तालुके, क्लस्टर्स, ग्रामपंचायती, लाभार्थ्यी यांच्या कामाचा प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात येणार आहे, हे आपणास ज्ञात आहे. त्यादृष्टीने नियोजन करून आपले कार्यक्षेत्रात महा आवास अभियान २०२३-२४ ची यशस्वी अंमलबजालवणी करणेसाठी शुभेच्छा!**

**सोबत :- उपरोक्त IEC साहित्य जोडले आहे.**

(डॉ.राजाराम दिघे)
**संचालक,**
**राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण,**
**महाराष्ट्र राज्य**

**प्रत:-** १. मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहितीस्तव.
३. उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
४. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकाय यंत्रणा (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव.

# अभियान होर्डिंग




# अभियान बॅनर (Banner)



# अभियान पोस्टर (Poster)



महाराष्ट्र शासन

ग्राम विकास व पंचायत राज विभाग

**राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण**



मा.ना.श्री. एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस, उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | मा.ना.श्री. अजित पवार, उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | मा.ना.श्री. गिरीष महाजन, मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज

# महा आवास अभियान २०२३-२४

*दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व गुणवत्ता आणणेसाठी राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीत "महा आवास अभियान २०२३-२४" राबविण्यात येत आहे.*

## अभियान राबविण्याचे उद्देश

- ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे.
- ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये शासकीय यंत्रणा व पंचायतराज संस्था यांचेबरोबरच समाजातील सर्व घटक जसे- स्वयंसेवी संस्था (लायन्स क्लब, रोटरी क्लब, इ.), सहकारी संस्था (साखर कारखाने, दुधसंघ, इ.), खासगी संस्था (Corporates), तंत्र शिक्षण संस्था (IITB, COEP, VNIT, इ.), बँका, लोकप्रतिनिधी, लाभार्थी, ग्रामस्थ, इ. भागधारकांचा सक्रीय सहभाग वाढविणे.
- राज्यात ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील भागधारकांची क्षमताबांधणी व जन-जागृतीद्वारे लोक चळवळ उभी करणे.
- ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या विविध योजनांचा कृतिसंगम (Convergence) घडवून आणणे.
- ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रामध्ये नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून घरांची गुणवत्ता वाढविणे.

## अभियान कालावधीत राबवावयाचे उपक्रम

- भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे.
- घरकुलांना उद्दिष्टांप्रमाणे १०० टक्के मंजूरी देणे.
- मंजूर घरकुलांना सर्व हप्ते वेळेत वितरीत करणे.
- सर्व मंजूर घरकुले भौतिक दृष्ट्या पूर्ण करणे.
- प्रलंबित घरकुले (Delayed Houses) पूर्ण करणे.
- ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणे.
- बहुमजली इमारती, गृहसंकुले व हाऊसिंग अपार्टमेंटची उभारणी करणे
- डेमो हाऊसचा प्रभावी वापर करणे.
- शासनाच्या विविध योजनांशी कृतीसंगमातून लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावणे.
- नावीन्यपूर्ण उपक्रम (Innovations / Best Practices) राबविणे.

## 'महा आवास अभियान २०२३-२४' कालावधीतील उत्कृष्ट कार्याचा गौरव

'महा आवास अभियान २०२३-२४' मध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना पुढीलप्रमाणे 'महा आवास अभियान पुरस्कार २०२३-२४' देऊन गौरविण्यात येईल.

### -: राज्यस्तरीय पुरस्कार :-

**प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

१. सर्वोत्कृष्ट विभाग- प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक
२. सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक
३. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक
४. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक
५. सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत, सर्वोत्कृष्ट गृह संकुल व सर्वोत्कृष्ट हाऊसिंग अपार्टमेंट - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक

**राज्य पुरस्कृत आवास योजना**

१. सर्वोत्कृष्ट विभाग- प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक
२. सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक
३. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक
४. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक
५. सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत, सर्वोत्कृष्ट गृह संकुल व सर्वोत्कृष्ट हाऊसिंग अपार्टमेंट - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक

### -: विभागस्तरीय पुरस्कार :-

**प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

१. सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक
२. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक
३. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक
४. शासकीय जागा उपलब्धता व वाळू उपलब्धता सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.

**राज्य पुरस्कृत आवास योजना**

१. सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक
२. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक
३. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक
४. शासकीय जागा उपलब्धता व वाळू उपलब्धता सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.

### -: जिल्हास्तरीय पुरस्कार :-

**प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

१. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक
२. सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक
३. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक

**राज्य पुरस्कृत आवास योजना**

१. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक
२. सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक
३. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक

### -: तालुकास्तरीय पुरस्कार :-

**प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

१. सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक
२. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक
३. सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक

**राज्य पुरस्कृत आवास योजना**

१. सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक
२. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक
३. सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक

### -: ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कार :-

**प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण** - सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक

**राज्य पुरस्कृत आवास योजना** - सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक

*"महाराष्ट्र शासनाचा एकच ध्यास, २०२४ पर्यंत सर्वांसाठी आवास"*

अधिक माहितीसाठी संपर्क :- ग्रामसेवक, ग्रामपंचायत/गट विकास अधिकारी, पंचायत समिती/प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा